# मेट्रो-३ मार्गिकेतील २२वा बोगदा पूर्ण!

## विद्यानगरी-सीएसएमआयटी १ स्थानकादरम्यानचे भुयारीकरण पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

मेट्रो-३ कुलाबा-वांद्रे-सीप्झ भूमिगत मेट्रो कामाला चांगलाच वेग आला आहे. गुरुवारी या मार्गिकितील २२ व्या बोगद्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. टीबीएम गोदावरी २ ने पॅकेज ६ मधील विद्यानगरी ते सीएसएमआयटी १ या स्थानकांदरम्यान डाऊन लाईनच्या दिशेने २.८ किमी इतके अंतर २०४८ रिंग्जच्या सहाय्याने पूर्ण केले आहे. गोदावरी २ हे कृष्णा २, वैतरणा १, वैनगंगा-१, सूर्या १ यानंतर मेट्रो-३ मार्गिकिच्या भुयारीकरणाचे महत्त्वपूर्ण काम पूर्ण करणारे सहावे टीबीएम ठरले आहे.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे सुरू असलेल्या मेट्रो-३ मार्गिकिच्या भुयारीकरणाच्या कामाने गती घेतली आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या संपूर्ण मार्गिकिचे एकूण ५६ किमी (अप आणि डाऊन) भुयारीकरणाचे काम टीबीएमद्वारे प्रगतिपथावर आहे. हा मार्ग देशातील सर्वात लांब पूर्णत भुयारी मार्ग आहे. आतापर्यंत यातील ३३ किमी मार्गिकिचे काम पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे काम तब्बल १७ टीबीएमच्या साहाय्याने सुरू असून ही टीबीएम जमिनीत उतरवण्यासाठी मुंबईतील कफ परेड, इरॉस, आझाद मैदान, सायन म्युझियम, सिद्धिविनायक मंदिर, नया नगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारीपूत, सहार रोड आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ येथे शाफ्ट तयार केले आहे.

भुयारीकरणासोबतच खोदकाम, बेस स्लॅब, कॉर्नकोर्स स्लॅब, कॉलम तसेच भिंतीची बांधणी यासारखी कामेही युद्धपातळीवर सुरू आहेत. या भुयारीकरणाच्या कामासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला अनेक वादांना तोंड द्यावे लागले आहे. पूर्णपणे भूमिगत अर्थात जमिनीखालून जाणाऱ्या या मार्गिकेवर एकूण २७ थांबे आहेत.